RNI Regd. No. 72105/99 ■ सातारा

■ www.rajdand.com Youtube, FB, Insta, Twitter, Koo ■ rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

■ वर्ष २५, ■ अंक १८८ ■ शनिवार, १६ मार्च २०२४, पश्चिम महाराष्ट्र ■ पाने ८ (सुप्रभात) ■ किंमत रू ५/-

## महत्त्वाचे

### जमीन आरक्षण संदर्भात दिशा ठरविण्यासाठी उद्या शिरोळात बैठक : पृथ्वीराजसिंह यादव

**शिरोळ :** शिरोळ नगर परिषदेकडून टाकण्यात आलेल्या जमीन आरक्षण संदर्भात पुढील दिशा ठरविण्यासाठी कल्लेश्वर मंदिर, शिरोळ येथे रविवारी १७ मार्च,रोजी सायं. ६ वा. कल्लेश्वर मंदिर, शिरोळ येथे उपस्थित रहावे असे आवाहन युवा नेते पृथ्वीराजसिंह यादव यांनी केले आहे

शिरोळ नगरपरिषदेकडून काही दिवसापूर्वी विकास आराखड्याच्या पार्श्वभूमीवर शहर व शहरालगतच्या ठराविक जमिनी आरक्षित करण्यात आल्या आहेत. त्याची जाहीर प्रसिद्धी केली आहे. या आरक्षण प्रसिद्धीमध्ये शहरातील अनेक, गोरगरिब, अल्पभूधारकांच्या जमिनी जागा गुंतवण्यात आल्या आहेत. जमीन,आरक्षणामुळे नागरिक, शेतकऱ्यांच्या मध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. जमीन आरक्षणाच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी सर्व नागरिकांनी एकत्रित येऊन लढा देण्याची आवश्यकता आहे. य आरक्षणाचा लढा कसा व कोणत्या पद्धतीने द्यायचा ? या बैठकीत यासंदर्भात विचार विनिमय करून पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे . या बैठकीमध्ये ज्या -ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर आरक्षण पडले आहे, अशा शेतकऱ्यांच्या विचाराने, विनिमयाने पुढील मार्ग अवलंबला जाणार आहे.

# राज्य मंत्रिमंडळाची आज पुन्हा बैठक

## आचारसंहितेपूर्वी धमाकेदार निर्णयांची घोषणा

लोकसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीराज्य सरकारनेलोकप्रिय निर्णयांचा धडाका लावला असून मंत्रिमंडळाची एकाच आठवड्यातील तिसरी बैठक उद्या पार पडणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोग उद्या दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद घेऊन लोकसभा निवडणुकांच्या तारखा घोषित करणार आहे. त्यापूर्वी मतदारांना भुरळ घालण्यासाठी सरकारकडून काही मोठ्या निर्णयांची घोषणा होऊ शकते.-



मंत्रिमंडळाच्या बुधवारी पार पडलेल्या बैठकीत अहमदनगर जिल्हा आणि वेल्हे तालुक्याच्या नामांतरासह अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ऐन निवडणुकांच्या तोंडावर लोकांच्या भावनांना हात घालणारे निर्णय घेऊन जनमत आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न या निर्णयांच्या माध्यमातून महायुती सरकारकडून केला जात असल्याचं बोललं जात आहे. त्यातच आता राज्य मंत्रिमंडळाची आठवडाभरातीलतिसरी बैठक उद्या पार पडणार असल्याची माहिती समोर आली आहे. सह्याद्री अतिथीगृह इथं सकाळी ११ वाजता मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे.दरम्यान, उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नेमके काय मोठे निर्णय घेतले जातात, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठक कोणते निर्णय घेण्यात आले?- मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी अद्ययावत मराठी भाषा धोरण जाहीर- पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ. आता मिळणार महिन्याला १५ हजार रुपये- अहमदनगर शहराचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' करण्यास मान्यता- केंद्राच्या सहाय्याने लहान शहरांमध्ये अग्निशमन सेवा बळकट करणार. राज्याच्या १५३ कोटी हिश्श्याला मान्यता- श्रीनगरजवळ महाराष्ट्र राज्य अतिथीगृह बांधणार. अडीच एकर भूखंड घेणार- कोल्हापूर, सांगली जिल्ह्यामधील पूर नियंत्रणासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य. ३२०० कोटींचा प्रकल्प- भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेत ५० वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्ज- राष्ट्रीय आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत घेणार. हजारो कर्मचाऱ्यांना लाभ- महानंद प्रकल्पाची स्थिती सुधारणार. नफ्यात आणणार- मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मान्यता. ३५ गावांना लाभ होणार- मूर्तिजापूर येथील वडगाव साठवण तलावाची दुरुस्ती करणार. १२५ हेक्टर जमीन सिंचित करणार- शुभमंगल सामूहिक विवाह योजनेत अनुदानामध्ये वाढ. आता संस्थांना २५ हजार रुपये अनुदान.- मानसेवी वैद्यकीय अध्यापकांचे मानधन वाढविले.- आयटीआय मधील कंत्राटी शिल्पनिदेशकांना नियमित शासन सेवेत घेणार.- कृषी वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण करण्यासाठी ९०२० कोटी एआयआयबी बँकेकडून घेणार.- शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करणार

११ हजार ५८५ कोटींच्या प्रकल्पास मान्यता- पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे एकत्रीकरण करून पुनर्रचना. प्रशासनात सुधारणा होणार- पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नाव राजगड करण्यास मान्यता- म्हसळा तालुक्यात शासकीय युनानी महाविद्यालय व रुग्णालय सुरू करणार. युनानी उपचार प्रणालीला प्रोत्साहन-

आशा स्वयंसेविका मानधनात भरीव पाच हजार रुपये वाढ- मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावे बदलणार- मुंबई उपनगरातील वाहतुकीचा मार्ग आणखी मोकळा होणार. उत्तन ते विरार सागरी सेतू मार्गास मान्यता- मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत २३ हजार किलोमीटरचे रस्ते बांधणार. या वर्षात दहा हजार किमी रस्ते- भोगवटामूल्याची रक्कम कमी करणार- महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या अकादमीसाठी कळवा येथील शासकीय जमीन- जालना खामगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग. २४५३ कोटी राज्याच्या हिश्यास मान्यता- दूध व दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता तपासण्याचे अधिकार पशुसंवर्धन आयुक्तांना

### काँग्रेसने ओबीसी उमेदवार दिल्यास पुण्यात भाजप गोत्यात

**पुणे :** राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा तापलेला आहे. यंदा मतदानातून सत्ताधारी भाजपलाच काय त्यांच्यासमवेत सत्तेत सहभागी झालेल्या शिवसेना - राष्ट्रवादी पक्षांना ( गट) त्याची मोठी झळ बसणार असल्याची दाट शक्यता आहे. नेमक्या या स्थितीचा काँग्रेसने फायदा उठवला तर पुणे लोकसभा मतदारसंघ पुन्हा काबीज करण्याची नामी संधी काँग्रेसला आहे ;मात्र त्यासाठी ओबीसी उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात उतरविल्यास ओबीसी वर्गासह मराठा समाजाची मते काँग्रेससाठी निर्णायक ठरतील. त्यातही काँग्रेस पक्षाने केलेल्या नव्या धोरणानुसार 'इलेक्टीव्ह मेरीट' असलेला निष्ठावंत चेहरा दिला तर भाजप निश्चित गोत्यात येईल आणि पुणे लोकसभा मतदारसंघावर पुन्हा काँग्रेसचा झेंडा फडकल्याचे चित्र पाहावयास मिळू शकते.

# निवडणुकीपूर्वी मोदी सरकारची सामान्यांना मोठी भेट

## ■ पेट्रोल-डिझेलच्या किमतीत घट

लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रातील मोदी सरकारने देशातील सामान्यांना मोठा दिलासा दिला आहे. सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात करण्याची घोषणा केली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांनी कपात करण्यात आली असून, नवीन किमती १५ मार्च २०२४ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून लागू होतील.

केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी ट्विट करुन ही माहिती दिली. ते म्हणाले की, 'पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत २ रुपयांनी कपात करुन देशाचे यशस्वी पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की, कोट्यवधी कुटुंबाचे कल्याण हे त्यांचे ध्येय आहे. जग कठीण काळातून जात असताना विकसित आणि विकसनशील देशांमध्ये पेट्रोलचे दर ५० ते ७२ टक्क्यांनी वाढले होते. आपल्या शेजारील अनेक देशांमध्ये तर पेट्रोल उपलब्ध नव्हते. १९७३ नंतर पहिल्यांदाच इंधनाचे सर्वात मोठे संकट असूनही पंतप्रधान मोदींच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे देशावर त्याचा परिणाम झाला नाही. भारतातील पेट्रोलचे दर वाढण्याऐवजी गेल्या अडीच वर्षांत ४.६५ टक्क्यांनी कमी झाले.'३९ देशांकडून कच्च्या तेलाची खरेदी

पुरी यांनी पुढे लिहिले की, 'भारतात इंधनाचा पुरवठा स्थिर राहिला, स्वस्त दरात राहिला आणि सरकारची पावलेही हरित ऊर्जेकडे जात राहिली. याचा अर्थ भारताने उर्जेची उपलब्धता, शाश्वतता



राखली. भारत हा एकमेव देश होता, जिथे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या नाहीत. पीएम मोदी पंतप्रधान होण्यापूर्वी २७ देशांकडून कच्चे तेल खरेदी करायचो, परंतु मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही आमच्या देशवासीयांना स्वस्त पेट्रोल, डिझेल आणि गॅस देण्यासाठी ही व्याप्ती वाढवली आणि आता गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही ३९ देशांकडून खरेदी करत आहोत.'भारतातील पेट्रोलचे दर अनेक देशांपेक्षा कमी

हरदीप पुरी पुढे लिहितात, '१४ मार्च २०२४ रोजी भारतात(भारतीय रुपयांप्रमाणे) पेट्रोल सरासरी ९४ प्रति लिटर आहे, परंतु इटलीमध्ये ते १६८.०१, म्हणजेच ७९% जास्त; फ्रान्समध्ये १६६.८७, म्हणजेच ७८% जास्त; जर्मनीमध्ये १५९.५७, म्हणजेच ७०% जास्त आणि स्पेनमध्ये १४५.१३, म्हणजेच ५४% जास्त दराने विकले जाते. डिझेलच्या किमतींची तुलना केली, तर भारतात सरासरी ८७ प्रति लिटर आहे, तर इटलीमध्ये १६३.२१, म्हणजेच ८८% जास्त, फ्रान्समध्ये १६३.५७ म्हणजेच ८६% जास्त, जर्मनीमध्ये १५५.६८, म्हणजे ७९% जास्त आणि स्पेनमध्ये १३८.०७ म्हणजे ५९% जास्त आहे.जगभरात काहीही घडत असले तरी, मोदींच्या नेतृत्वाखाली देशाच्या कानाकोपऱ्यात, प्रत्येक नागरिकाचा इंधन पुरवठा अखंडीत राहावा, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले. देशाच्या प्रगतीचा वेग कधीच थांबला नाही. आजही आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत दिलासा होताच पंतप्रधान मोदी यांनी तात्काळ पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करुन त्यांच्या कुटुंबाला आणखी एक भेट दिली. मोदींनी नोव्हेंबर २०२१ आणि मे २०२२ मध्ये दोन वेळा पेट्रोल आणि डिझेलवरील केंद्रीय उत्पादन शुल्क कमी केले, तर भाजप शासित राज्यांनी व्हॅट दर कमी केले. हेच कारण आहे की, आजही भाजपशासित राज्ये आणि इतर राज्यांमध्ये पेट्रोलच्या किमतीत सुमारे १५ आणि डिझेलच्या दरात सुमारे ११ चा फरक आहे.

# लोकसभा निवडणुकीचा आज वाजणार बिगुल

## हॅट्रिक करण्यास भाजप सज्ज; विरोधक देणार आव्हान

**नवी दिल्ली : सर्वांत मोठा लोकशाही उत्सव असलेल्या भारतातील लोकसभा निवडणुकीचा बिगुल शनिवारी वाजणार आहे. १६ मार्च रोजी दुपारी तीन वाजता भारतीय निवडणूक आयोग निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणार आहे. त्याबाबत निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्याने 'एक्स'वर ही माहिती दिली. त्यानंतर देशात आदर्श आचारसंहिता लागू होईल.**

**लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान होऊ शकते. याआधीही २०14 आणि २०१९ मध्ये सात टप्प्यांत मतदान झाले होते. तत्पूर्वी, निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर ज्ञानेश कुमार व सुखबीर सिंग संधू यांनी शुक्रवारी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासोबत तयारीचा आढावा घेतला.**

**सलग तिसऱ्यांदा निवडणूक जिंकून हॅट्रिक करण्यासाठी भाजप रिंगणात उतरली आहे, तर विरोधी पक्ष एकजूट होऊन इंडिया आघाडीच्या माध्यमातून भाजपचा विजयी रथ रोखण्याचा प्रयत्न करणार आहेत.**

**अब की बार, ३७० पार**

**२०१९ मध्ये भाजपने ३०३ जागा जिंकून इतिहास रचला होता. 'अब की बार, ३७० पार'चा नारा भाजपने यंदा दिला आहे. तर एनडीएसह ४०० जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी भाजपने नियोजन आणि तयारीला सुरुवातही केली आहे. अयोध्येत राम मंदिराची उभारणी, कलम ३७० रद्द करणे, तिहेरी तलाक कायदा रद्द करणे, सीएए लागू करणे, ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य तसेच गरीब कल्याणकारी योजना या भाजपच्या जमेच्या बाजू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला विश्वास आहे की, केंद्रात तिसऱ्यांदा पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन होईल.**

### विरोधकांची एकजूट

**पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विजयी रथ रोखण्यासाठी विरोधी पक्षांची आघाडी इंडिया एकजूट होऊन लढणार आहे. जास्तीत जास्त जागांवर विरोधकांचा एकच उमेदवार उभा करून विरोधी मतांचे विभाजन रोखण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. पश्चिम बंगाल, पंजाब अशी काही राज्ये सोडली तर इतर राज्यांत विरोधी पक्ष एकवटले आहेत. पंतप्रधान पदाचा उमेदवार म्हणून एकाही नेत्याच्या नावावर एकमत न होणे ही विरोधकांची सर्वांत मोठी कमजोरी आहे. ममता बॅनर्जी, भगवंत मान, मायावती यांसारख्या नेत्यांनी आघाडी नाकारणे ही एक इंडिया आघाडीसाठी नकारात्मक बाजू आहे.**




# निवडणूक रोख्यांवरून राहुल गांधींचे घणाघाती आरोप

## अमित शाह यांनी जाहीर केली निधीची आकडेवारी

**दिल्ली :** सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर निवडणूक आयोगाने निवडणूक रोख्यांचे तपशील आपल्या वेबसाइटवर प्रसिद्धकरताचकाँग्रेसनेते आणि खासदारराहुल गांधीयांनी भाजपवर घणाघाती आरोप केले. या खंडणी रॅकेटच्या माध्यमातून भाजप पैसे गोळा करत असल्याचं ते म्हणाले.राहुल गांधीयांच्या या आरोपांना आता भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्रीअमित शाहयांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. तसंच राजकीय निधीबाबत पारदर्शकता येण्यासाठी निवडणूक रोखे ही योजना आणण्यात आली होती. आता राजकारणात पुन्हा काळा पैसा येण्याचा धोका आहे, असंहीअमित शाह म्हणाले.

राहुल गांधींवर पलटवार करताना अमित शाह यांनी म्हटलं आहे की, कॅशच्या माध्यमातून जो निधी राजकीय पक्षांना मिळत होता, त्यामध्ये आजपर्यंत कोणाचं नाव जाहीर झालंय का? कोणाचंच नाही झालं. मात्र जे राजकीय आरोप आहेत, त्यांना मला सविस्तर उत्तर द्यायचं आहे. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून भाजपला खूप मोठा फायदा झाला आहे, कारण भाजप सत्तेत आहे, असा अजेंडा चालवला जात आहे. निवडणूक रोखे हे जगातील सगळ्यातं मोठं खंडणी रॅकेट असल्याचं वक्तव्य आज राहुल गांधी यांनी केलं आहे. त्यांना कोण असं लिहून देतं, माहीत नाही. मी देशाच्या जनेतसमोर आज चित्र स्पष्ट करू इच्छितो. भाजपला निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून ६ हजार कोटींचा निधी मिळाला आहे. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून मिळालेल्या एकूण निधीचा आकडा २० हजार कोटी रुपये इतका आहे. मग उरलेले १४



हजार कोटी रुपये कुठे गेले? तृणमूलकाँग्रेसला१६०० कोटी रुपये मिळाले, काँग्रेसला १४०० कोटी रुपये मिळाले आहेत, असा दावा अमित शाह यांनी केला आहे. ते इंडिया टुडे कॉन्क्लेव्हमध्ये बोलत होते. काय आहे राहुल गांधींचा आरोप?भाजपवर घणाघाती आरोप करताना आज भिवंडी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधी म्हणाले की, मोठ्या कंपन्यांकडून पैसे उकळण्याचे हे एक साधन आहे. ही योजना म्हणजे जगातील सर्वात मोठे खंडणी रॅकेट. ईडी-सीबीआय तपास करत नाहीत, ते भाजपसाठी वसुली करतात. या पैशांचा वापर देशातील पक्ष फोडण्यासाठी होतो. भारताच्या इतिहासातील या सर्वात मोठ्या भ्रष्टाचारात पंतप्रधान मोदींचा हात आहे, असा हल्लाबोल राहुल गांधींनी केला आहे.दरम्यान, सुप्रीम कोर्टाने सांगितलं की, नरेंद्र मोदींनी लॉन्च केलेल्या निवडणूक रोख्यांचा तपशील सार्वजनिक करावा. त्यानंतर देशातील बड्या कॉर्पोरेट कंपन्यांनी भाजपला हजारो कोटी रुपये दिल्याची आकडेवारी समोर आली. हे देशविरोधी कृत्य आहे. यापेक्षा मोठे देशविरोधी कृत्य असू शकत नाही.

भाजप सरकार ईडी, सीबीआय, आयटीवर दबाव टाकून कंपन्यांकडून पैसे उकळते. ज्या कंपन्यांवर तपास यंत्रणांनी कारवाई केली जाते, त्या कंपन्या भाजपला देणगी देतात. संपूर्ण देशाची व्यवस्था भ्रष्टाचारात ढकलण्यासारखे आहे. ही पंतप्रधान मोदींची आयडिया आहे. हे नितीन गडकरींनी नाही, तर पंतप्रधान मोदींनी केलं आहे, अशा शब्दांत राहुल गांधी यांनी सरकारचा समाचार घेतला आहे.

## पाहिजेत

राजदंड

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात तालुका व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com

# वाटा कुणाला, घाटा कुणाला?

जगभर व्यापारवृद्धीसाठी करार केले जातात. त्यात दोन्हींचा फायदा विचारात घेतला जातो. कधी मैत्रीपूर्ण करारात संबंधाला फायद्यापेक्षा जास्त महत्त्व द्यावे लागते. भारताची १४४ कोटींची बाजारपेठ अनेकांना खुणावत असते. एवढ्या मोठ्या बाजारपेठेत शिरकाव करण्यासाठी जगातील अनेक देश प्रयत्नशील असतात. भारताने 'युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन (ईएफटीए)शी नुकताच करार केला. 'ईएफटीए' मध्ये आइसलँड, लिकटेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड यांचा समावेश आहे. हे चार देश युरोपीयन महासंघाचे सदस्य नाहीत; पण 'ईएफटीए'नावाचा त्यांचा वेगळा गट आहे. भारत आणि 'ईएफटीए' यांच्यातील हा करार गेल्या १६ वर्षातील २१ फेऱ्यांच्या वाटाघाटीनंतर झाला आहे. त्यामुळे भारताचा युरोपातील या चार देशांसोबतचा व्यापार सोपा होणार आहे. पुढील १५ वर्षांत १०० अब्ज डॉलर (सुमारे ८ लाख कोटी रुपये) गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळे भारतात नवीन कंपन्या उघडतील आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

भारतासाठी आइसलँड, लिकटेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंडसोबत व्यवसाय करणे सोपे होईल. याचा अर्थ आपण या देशांना अधिक माल विकू शकू आणि तिथूनही स्वस्त वस्तू आणू. पूर्वी सर्व वस्तू चीनमधून यायच्या; पण आता प्रत्येक देश चीनला पर्याय शोधतो आहे. अशा परिस्थितीत भारतासाठी ही मोठी संधी आहे. हा करार भारतासाठी का महत्त्वाचा आहे, कोणत्या क्षेत्राला फायदा होईल, कोणाला तोटा होईल आणि सध्या भारतासमोर कोणती आव्हाने आहेत हे समजून घेतले, की करार कोणाच्या फायद्याचा आणि कुणाच्या तोट्याचा हे समजू शकेल. 'ईएफटीए' म्हणजे 'युरोपीयन फ्री ट्रेड असोसिएशन' हा चार देशांचा समूह आहे. या चार देशांमधील व्यापाराला चालना देणे हे 'ईएफटीए'चे मुख्य कार्य आहे. याचा अर्थ या देशांमधील वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर कोणताही कर नाही. 'ईएफटीए' हा भारताचा पाचवा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२३ मध्ये, भारत आणि 'ईएफटीए' देशांदरम्यान २५ अब्ज डॉलरचा व्यापार झाला. 'ईएफटीए' १९६० मध्ये सुरू झाला. युरोपीय संघाशी स्पर्धा करण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली. त्याचे मुख्यालय स्वित्झर्लंडमधील जीनिव्हा येथे आहे. यामध्ये समाविष्ट केलेल्या चार देशांची एकूण लोकसंख्या १३.५ दशलक्ष आहे. त्यांचा एकूण जीडीपी सुमारे १.१ ट्रिलियन डॉलर्स आहे.

'ईएफटीए' ने आतापर्यंत युरोपबाहेरील सुमारे ४० देशांसोबत ३० व्यापार करार केले आहेत. भारताची सध्या त्याच्या बहुतांश प्रमुख व्यापारी भागीदारांसह व्यापार तूट आहे. याचा अर्थ आपण त्या देशांना विकण्यापेक्षा जास्त वस्तू आयात करतो. अमेरिकेशिवाय जवळपास सर्वच देशांची हीच स्थिती आहे. पूर्वीच्या 'एफटीए' करारांमध्येही असेच काहीसे घडले आहे, विशेषत: दक्षिण-पूर्व आशियाई देशांसोबत (आसियान) झालेल्या करारांमध्ये.

भारत सरकार वस्तूंच्या आयातीवर उच्च कर (सुमारे १८ टक्के) लादते, तर इतर देशांमध्ये हा कर खूपच कमी म्हणजे पाच टक्के आहे. आसियान देशांसोबत झालेल्या करारानंतर तिथून स्वस्तात माल भारतात येऊ लागला; पण त्या देशांना फारसा माल विकणे भारताला शक्य झाले नाही. अशा स्थितीत 'ईएफटीए' देशांतील कंपन्यांनी येथे व्यवसाय सुरू केल्यास भारताला अनेक फायदे होतील. भारतात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. आपल्या देशातून इतर देशांमध्ये अधिक माल पाठवता येईल. म्हणजे 'ईएफटीए' करारामुळे भारताची व्यापार तूट कमी होण्यास मदत होऊ शकते. भारतीय शेतकऱ्यांना आता त्यांचा माल 'ईएफटीए' देशांमध्ये विकणे सोपे होणार आहे. तेथे आपल्याला कमी कर भरावा लागेल किंवा तो अजिबात भरावा लागणार नाही. यामुळे शेतकऱ्यांना अधिक नफा मिळेल. शिक्षित भारतीयांना 'ईएफटीए' देशांमध्ये काम करण्याच्या अधिक संधी मिळतील. तसेच, हा करार केवळ व्यापाराबाबत नाही तर बौद्धिक संपदा आणि लैंगिक समानता यांसारख्या मुद्द्यांवर सहकार्य वाढवेल; मात्र तरीही भारत सोन्यावरील कर कमी होणार नाही. विशेष म्हणजे 'ईएफटीए' देश भारताला विकत असलेल्या वस्तूंपैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त सोने आहे. चार युरोपीय देशांसोबतच्या कराराचा काही क्षेत्रांना अधिक फायदा होऊ शकतो. ही क्षेत्रे आहेत- तंत्रज्ञान, फार्मा, केमिकल, अन्न आणि अभियांत्रिकी. 'ईएफटीए' देशांपैकी एक असलेल्या नॉर्वेकडे जगातील सर्वात मोठा सार्वभौम निधी आहे. या फंडाने विशेषत: तंत्रज्ञान कंपन्यांच्या शेअर्समध्ये पैसे गुंतवून चांगला नफा कमावला आहे. 'ईएफटीए' देशांतून भारतात येणारा पैसा तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये गुंतवला जाण्याची शक्यता आहे. याचा फायदा भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना होईल. कारण त्यांना त्यांचा व्यवसाय वाढवण्यासाठी पैसे मिळू शकतील. याशिवाय 'ईएफटीए' देशांना भारतात औषधे आणि रसायने बनवणाऱ्या कंपन्यांमध्ये पैसे गुंतवायचे आहेत. त्यामुळे भारतात नवीन औषधे आणि रसायने तयार होऊ लागतील.

भारताला औषधांसाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही. सध्या भारत चीनमधून सर्वाधिक औषधे आणतो. केवळ औषधांच्या बाबतीत भारत दरवर्षी सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या वस्तू चीनकडून खरेदी करतो. खाद्यपदार्थांचे उत्पादन करणारे नवीन कारखाने भारतात उभारले जाऊ शकतात. शेतकऱ्यांनाही याचा फायदा होईल. कारण त्यांना त्यांच्या पिकांना चांगला भाव मिळणार आहे.

'ईएफटीए' देश भारतातील रस्ते आणि पूल यांसारख्या पायाभूत सुविधांच्या उभारणीतही गुंतवणूक करतील अशी अपेक्षा आहे. यामुळे भारतातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. आतापर्यंत नॉर्वेजियन कंपन्या भारतात त्यांचा माल विकताना खूप जास्त आयात कर भरत असत. कधीकधी हा कर ४० टक्क्यापर्यंत होता; पण आता भारत आणि 'ईएफटीए' देशांमधील करारामुळे नॉर्वेला मोठा फायदा होणार झाला आहे. आता नॉर्वेजियन कंपन्यांना त्यांच्या बहुतांश वस्तू भारतात विकण्यावर कोणताही कर भरावा लागणार नाही. यामुळे नॉर्वेजियन कंपन्या कमी किमतीत भारतात माल पाठवू शकतील आणि त्यांना जास्त नफा मिळेल. भारतालाही याचा फायदा होईल. कारण भारतीयांना नॉर्वेतून स्वस्तात माल मिळू शकणार आहे.

'ईएफटीए' देशांमध्ये माल निर्यात करणे सोपे होणार नाही. भारत आणि 'ईएफटीए' देशांमधील करार चांगला आहे; पण या युरोपीय देशांमध्ये (आईसलँड, लिकटेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड) भारतीय वस्तू विकणे सोपे जाणार नाही हेही खरे आहे. स्वित्झर्लंडने यापुढे कोणत्याही देशातून येणाऱ्या वस्तूंवर कर आकारणार नसल्याचे आधीच जाहीर केले आहे. म्हणजे तिथे आधीच अस्तित्वात असलेल्या युरोपीयन कंपन्यांचा माल भारतातील मालाइतकाच स्वस्त असेल. त्यामुळे तेथे चांगला व्यवसाय करण्यासाठी भारतीय कंपन्यांना त्यांच्या किमती कमी ठेवाव्या लागतील आणि त्यांच्या मालाची गुणवत्ता खूप चांगली ठेवावी लागेल. त्यानंतरच भारतीय वस्तू या युरोपीय देशांमध्ये विकल्या जातील.

भारत आणि 'ईएफटीए' देशांदरम्यान अद्याप इतका मोठा व्यापार झालेला नाही. जानेवारी ते डिसेंबर २०२३ पर्यंत, भारताने 'ईएफटीए' देशांना फक्त १.८७ अब्ज डॉलरच्या वस्तू विकल्या, तर भारताने 'ईएफटीए' देशांकडून २०.४५ अब्ज डॉलर किमतीच्या वस्तू खरेदी केल्या. भारताने बहुतेक सोने (सुमारे १९.६५ अब्ज डॉलर) स्वित्झर्लंडकडून खरेदी केल्यामुळे ही आयात झाली. भारत रसायने, लोखंड, सोने, हिरे, धागे, खेळाचे सामान, काचेच्या वस्तू आणि औषधे 'ईएफटीए' देशांना पाठवतो. सोन्याव्यतिरिक्त, भारत 'ईएफटीए' देशांकडून चांदी, कोळसा, औषधे, वनस्पती तेल, दुग्धशाळा, वैद्यकीय आणि वैज्ञानिक उपकरणे आयात करतो. भारत आणि 'ईएफटीए' देशांमधील कराराला आधी या पाचही देशांच्या संसदेची मान्यता घ्यावी लागेल. २०२५ पर्यंत स्वित्झर्लंड याला मान्यता देण्याचा प्रयत्न करत आहे. त्यानंतरच या कराराची अंमलबजावणी होईल. भारतात लवकरच लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत.

निवडणुकीपूर्वीच भारताने ऑस्ट्रेलिया आणि संयुक्त अरब अमिरातीसोबत गेल्या दोन वर्षांत मोठे व्यापारी करार केले आहेत. गेल्या दोन वर्षांपासून भारत आणि ब्रिटनमध्ये अशाच प्रकारच्या व्यापार करारावर चर्चा सुरू आहे; पण ब्रिटनच्या व्यापारमंत्र्यांचे म्हणणे आहे, की निवडणुकांपूर्वी भारतात करार होणे कठीण आहे. ब्रिटनला कोणत्याही निवडणुकीचा वापर डेडलाइन म्हणून व्हायला नको आहे. निवडणुकीमुळे आगामी काळात कोणताही नवीन व्यापार करार होण्याची शक्यता नाही. ही बाब भारतासाठी अडचणीची आहे. भारताने 'ईएफटीए' सोबत व्यवसाय करार केला आहे; परंतु ब्रिटन आणि युरोपीय महासंघासोबत 'एफटीए' सारख्या करारांवर राजकीय अनिश्चिततेचा धोका अजूनही कायम आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे राजकीय अस्थिरता. दुसरे कारण म्हणजे या देशांची भारताप्रती असलेली विचारसरणी. काही लोक भारताला चांगला व्यापारी भागीदार मानत नाहीत. त्यांना वाटते की भारतात व्यवसाय करणे सोपे नाही. जगातील प्रमुख गुंतवणूकदार भारताला एक प्रमुख आयातदार मानत असताना, व्हिएतनामच्या नेतृत्वाखालील दक्षिण-पूर्व आशियाई देश (आशियन) आणि मेक्सिकोसारखे उत्तर अमेरिकन देशदेखील गुंतवणुकीची ठिकाणे म्हणून उदयास येत आहेत. भारताने लवकरच काही पावले उचलली नाहीत तर ही सुवर्णसंधी वाया जाऊ शकते.

# शिरोळ तालुक्याच्या सर्वांगीन विकासासाठी कटीबध्द : माधवराव घाटगे

## १३ कोटी रूपयांच्या रस्ते कामाचे उदघाटन



**कुरुंदवाड :** शिरोळ चिंचवाड ते दत्त कारखाना युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष डॉ.
**शिरोळ तालुक्यातील १३ कोटी रुपयांच्या रस्ता रुंदीकरण कार्यक्रमाचा शुभारंभ गुरुदत्त शुगर्स चे चेअरमन माधवराव घाटगे यांच्या हस्ते करण्यात आला . शेजारी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे, रामचंद्र डांगे, राजवर्धन नाईक - निंबाळकर , विजय भोजे, मुंकुद गावडे आदी**

तालुका हा सधन तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील प्रत्येक गावांमध्ये रस्ता, गटर्स या सारख्या पायाभूत सविधा देणे गरजेचे आहे.त्यासाठी मी गुरूदत्त शुगर्स च्या माध्यमातून शासन स्तरावर पाठपुरावा करित असून, शिरोळ तालुक्याच्या सर्वांणगीन विकासासाठी कटीबध्द असल्याचे प्रतिपादन श्री गुरूदत्त शुगर्स चे चेअरमन व कार्यकारी संचालक माधवराव घाटगे यांनी केले. चिंचवाड व टाकळीवाडी- अकिवाट येथिल १३ कोटी रूपयांच्या रस्ता रुंदीकरण कामाच्या शुभारंभ कार्यक्रम प्रंसगी ते बोलत होते.

यावेळी बोलताना श्री. घाटगे म्हणाले राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण व वस्त्रोउदयोगमंत्री नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या सहकार्यातून नवीन मंजूर झालेला प्रमुख जिल्हा मार्ग (चऊठ) क्र.१२३ मधील पहिला स्टॉप या मार्गावरील ५.५ कि.मी रस्त्याच्या रूंदीकरणासाठी ८ कोटी रूपये तसेच अकिवाटटेक ते बाळूमामा मंदिर कमानीपर्यंत २.५ कि.मी रस्त्याचे रुंदीकरणासाठी ५ कोटी असे एकूण १३ कोटी रुपयांच्या निधी प्राप्त झाला असून त्यांचा शुभारंभ विविध मान्यवरांच्या हस्ते आज करण्यातआला आहे. ऊस हंगाम सुरू झालेनंतर व इतर वेळी रस्त्यावरील होणारी वाहनाची वर्दळ, अवजड व इतर वाहनांची वाढलेली संख्या लक्षात घेता मोठ्या रस्त्यांची गरज यामुळे पूर्ण होणार आहे.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर, जि.प सदस्य विजय भोजे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी गुरूदत्त चे एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर राहूल घाटगे, कुरूंदवाडचे माजी नगराध्यक्ष रामचंद्र डांगे, अरविंद माने, शिरोळ भाजपा तालुकाध्यक्ष मुंकुद गावडे, शिरोळचे नगरसेवक संभाजी भोसले, श्रीवर्धन माने-देशमुख, पं.स चे माजी उपसभापती सुदर्शन ककडे, अजित चौगुले, गुरूदत्त चे संचालक बबन चौगुले, शिवाजीराव माने-देशमुख, शिवाजी सांगले, आण्णासाहेब पवार, धोंडिराम नागणे, चिंचवाडचे सरपंच जालिंदर ठोमके, उपसरपंच बाबासो चौगुले, अकिवाटचे सरपंच वंदना पाटील, उपसरपंच प्रकाश रायनाडे, टाकळीवाडीचे सरपंच मंगल बिरणगे, उपसरपंच प्रमिला आवटे, चिंचवाड चे माजी सरपंच विठ्ठल घाटगे, टाकळीवाडीचे माजी सरपंच बाबासाहेब वनकोरे, तुकाराम चिगरे, कुशालआबा कांबळे, सुरेश सासणे अकिवाट-टाकळीवाडी चे सर्व ग्रा.पं. सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून शिरोळ व नांदणीत रूट मार्च

**शिरोळ :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्वच गावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या दृष्टीने सीमा सुरक्षा दल सशस्त्र जवानाचे पथक आणि शिरोळ पोलिसांकडून शिरोळ शहरात आणि नांदणी गावात रूट मार्च काढण्यात आला



शुक्रवारी दुपारी सीमा सुरक्षा दलाचे सशस्त्र जवान शिरोळ पोलीस ठाण्यातील अधिकारी पोलीस कर्मचारी आणि गृहरक्षक दलाचे जवान पोलीस वाहन यांच्या समवेत रूट मार्च काढण्यात आला शिरोळ शहरातील मुख्य रस्त्यावरील जय भवानी चौकापासून संभाजी चौक शिवाजी चौक आणि बस स्थानक परिसरात रूट मार्च काढण्यात आला या परिसरातील नांदणी गावातही प्रमुख रस्त्यावर आणि मुख्य चौकात रूट मार्च काढण्यात आला

पोलीस निरीक्षक एस एम गायकवाड पोलीस उपनिरीक्षक बी एम माने एस बी बंडगर यांच्यासह सहायक फौजदार पोलिस हवलदार पोलिस अमलदार पोलीस कर्मचारी आणि सीमा सुरक्षा दलाचे अधिकारी व सशस्त्र जवान गृहरक्षक दलाचे जवान हे या रूट मार्चमध्ये सहभागी झाले होते

पोलिसांनी अचानक काढलेल्या रूट मार्च मुळे या परिसरातील नागरिकांना आश्चर्याचा धक्का बसला आगामी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये सर्वच गावात शांतता राहावी या दृष्टीने पोलिसांनी आज रूट मार्च काढला असल्याची माहिती शिरोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एस एम गायकवाड यांनी दिली.

# थकीत वसूलीसाठी शहरातील दोन मिळकती सील

**कुरुंदवाड :** मार्च वर्षाअखेर असल्याने येथील पालिका प्रशासनाने कर वसुली मोहीम तीव्र केली आहे. कर वसूलीसाठी सक्ती व जप्तीची मोहीम राबविली जात असून थकीत वसूलीसाठी कर वसुली पथकाने गुरुवारी शहरातील दोन मिळकती सील केले आहेत.

थकीत कर न भरलेल्या. मुख्याधिकारी आशिष चौहान यांच्या नेतृत्वाखाली धडक मोहिमेमुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले असून एका दिवसांत २ लाख ५० हजारांचा कर वसुली झाली.

मार्च महिना निम्मा संपला तरी कर वसुली संथ गतीने होत असल्याने मुख्याधिकारी चौहान यांनी कर वसूलीसाठी सक्ती व जप्तीची मोहीम सुरू केली आहे. त्यासाठी पालिका कर्मचाऱ्यांचे पथक नेमण्यात आले आहे. घरफाळा, व्यावसायिक दुकाने या मिळकतींची कर वसुलीसाठी कर्मचारी वारंवार जावूनही दाद न घेणाऱ्या मिळकतधारकांचे मिळकती सील करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गुरुवारी दोन मिळकती सील केल्याने थकबाकीदार मिळकतधारकांचे धाबे दणाणले आहे.

पालिका प्रशासनाच्या कडक कारवाईमुळे गुरुवारी एका दिवसांत अडीच लाखांचा कर वसूल झाला आहे. मुख्याधिकारी चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली नेमण्यात आलेल्या कर वसुली पथकात सहाय्यक कर निरीक्षक मेघराज घोडके, निशिकांत ढाले, नंदकुमार चौधरी, दिनेश हात्तळगे, शशिकांत कडाळे यांचा समावेश आहे.

# सातारा शहरातील अतिक्रमणाबाबत निवडणुकीच्या तोंडावर रोहन राजेशिर्के यांच्या आंदोलनाची चर्चा

**सातारा :** सातारा शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण बोकाळले आहे . एकेकाळी पेन्शनरचे शहर असणाऱ्या साताऱ्यात सध्या अतिक्रमण न करेल तो आळशी अशी परिस्थिती झालेली आहे. सातारा लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सामाजिक कार्यकर्ते रोहन तथा दादासाहेब राजेशिर्के यांनी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. यामुळे आता सातारा शहरातील अतिक्रमणाबाबत खमंग चर्चा सुरू झालेली आहे.

याबाबत माहिती अशी की, सामाजिक कार्यकर्ते रोहन तथा दादासाहेब राजेशिर्के यांनी सातारा शहरातील आदालत वाड्यासमोरील ऐतिहासिक हौद असलेल्या इमारतीच्या शेजारी बांधकाम पूर्ण करताना त्याला कोणत्याही अडथळा होऊ नये. यासाठी हौद बुजवण्यात आला. वास्तविक पाहता राजे राजवाड्यांनी त्या काळी प्रजेसाठी हौद बांधला होता. पण, त्यांच्या पूर्वजांकडे आता सातारा नगरपालिका सत्ता असूनही याकडे कोणाचं लक्ष नाही. येथील बांधकाम अतिक्रमण करून करण्यात आलेले आहे. भाग निरीक्षकांनी हौद मुजवला असल्याचे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. पण त्याची खबर सातारा नगरपालिकेला प्रशासनाला नसल्याचेच दिसून आलेले आहे. या ठिकाणी अतिक्रमणाला अभिजीत दर्जा मिळावा. यासाठी मोठ्या प्रमाणात काही मध्यस्थी मंडळी हालचाल करत आहेत. असा गंभीर आरोप आंदोलन करते रोहन राजेशिर्के यांनी केला आहे.

ठेकेदारांचे हित पाहणाऱ्या सातारा नगरपालिकेबाबत डझनभर तक्रारी आहे. पण त्या तक्रारीचे पुढे काही होत नाही. नैसर्गिक ओढा बुजवून अतिक्रमण झाले असल्याने पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचुन अनेक दुकानदाराचे नुकसान होणार आहे. एवढेच नव्हे तर तेथे रस्ता सहा मीटरचा असताना वास्तव्यात पण नऊ मीटरचा रस्ता दाखवण्यासाठी नैसर्गिक ओढा मोजून नऊ मीटरचा रस्ता दाखवून तेथील सेवन हिल्स बांधकामाला परवानगी घेण्यात आलेली आहे . रस्त्याचे रुंदी कमी करण्यात आलेली आहे सदरच्या अतिक्रमण दूर करावं यासाठी रोहन राजे शिर्के यांनी आंदोलन सुरू केले असून या आंदोलनाला समाजातील विविध स्तरातील लोकांनी पाठिंबा दिलेला आहे. आज या आंदोलनाबाबत जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेतलेली नाही.

या आंदोलन स्थळी सातारा लोकसभेचे आरपीआयचे उमेदवार संजय गाडे, ज्येष्ठ पत्रकार शरद काटकर, अजित जगताप, महेश शिवदास, आदित्य गायकवाड, अशोक बरकडे , उमेश लांडगे ,महेश भिसे, महेश पाटील, संजय माने, सागर माने, प्रमोद मोरे, सचिन भोसले, सविता शिंदे आदी मान्यवरांनी भेट घेऊन पाठिंबा दिला आहे. दरम्यान या आंदोलनाची सांगता चांगली व्हावी अतिक्रमण दूर व्हावे. अन्यथा सातारा लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवाराचा झेंडा मिरवून जर कोणी यामध्ये सहभागी होत असेल तर ते सातारकरांचे दुर्दैव ठरणार आहे.



# भरवस्तीत एक दोन नव्हे तर चक्क तीन बिबट्यांचे दर्शन



**नारायणगाव :** नारायणगाव येथील दरंदळे मळा येथील साईबाबा मंदिराजवळील धनंजय दरंदळे यांच्या बंगल्या सभोवती एक नव्हे दोन नव्हे तर चक्क तीन बिबट्यांचा वावर असल्याचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त झाले आहे. गुरुवार दिनांक १४ रोजी रात्री १० वाजता हे बिबटे बंगल्या भोवती फिरत असल्याचे दृष्टिपथात पडले

या भागात गेली अनेक वर्षांपासून बिबट्याने पाळीव जनावरांवर हल्ले करून त्यांना फस्त केले आहे येथील सामाजिक कार्यकर्ते दत्तोबा दरंदळे यांनी सांगितले की, दोन दिवसांपूर्वी पहाटेच्या समयी प्रातर्विधीसाठी उठलो असता येथील धर्मराया मंदिरासमोर जुन्नर रस्त्यावर मला तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याने मी प्रातर्विधी सोडून घरामध्ये पलायन केले.

दरम्यान गुरुवार दिनांक १४ रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास येथील धनंजय दरंदळे यांच्या बंगल्यासमोरून एक मादी बिबट्या व तिचे दोन पूर्ण वाढ झालेले बछडे फिरत असताना सीसीटीव्ही फुटेज मध्ये कैद झाले आहेत.

दरम्यान काही महिन्यांपूर्वी येथे पूर्ण वाढ झालेल्या मोठा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला होता तरी देखील या ठिकाणी पुन्हा बिबट्याचे वास्तव्य आहे येथील वन विभागाचे वनपाल व वनरक्षक कधीतरी या भागात फिरतात असे सांगून येथील बिबट्यांना तात्काळ जेरबंद करावे अशी मागणी येथील शेतकरी संतोष खेबडे सुनील खेवडे सितासाम खेबडे व दत्तोबा दरंदळे धनंजय दरंदळे यांनी केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# मोदींनी जनतेच्या मतदानाच्या कर्जाची व्याजासह परतफेड केली : चंद्रशेखर बावनकुळे

## शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावर ओढला आसूड. भाजपच्या किसान परिक्रमा यात्रेचा समारोप

**मसूर** : १३ कोटी जनतेला न्याय देण्यासाठी मोदी सरकारने अनेक योजना आणल्या. मोदींनी कर्ज समजून व्याजासकट जनतेला ते विकासाच्या माध्यमातून परत केले. मात्र शरद पवारांनी कृषी मंत्री असताना कृषीक्षेत्राच्या अर्थसंकल्पात वाढ केली नाही. मोदींनी साडेपाच टक्के वाढ दिली. शरद पवारांचा काळ फुसका ठरला. असा घणाघात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बोलताना केला. मराठा आरक्षणाचा शत्रूही शरद पवारच असल्याचा आरोपही त्यांच्यावर करीत दोन दिवस मंत्रालयाची पायरी चढणारा व पेन नसलेला मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेवरही आसुड ओढला. बेलवाडी ता कराड येथे भाजपची किसान परिक्रमा यात्रेच्या समारोपप्रसंगी बोलताना आपल्या भात्यातले अनेक बाण बावनकुळेनी उपसले. गणेश बेगडे, विक्रांत पाटील, विक्रम पावस्कर, धैर्यशील कदम, मनोज घोरपडे, सुनील काटकर, रामकृष्ण वेताळ प्रमोद गायकवाड, दिपाली खोत यांच्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, जिल्ह्यातील किसान मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले महाराष्ट्रात केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या. प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्यमान भारत योजना, जलसिंचन योजना, सौर ऊर्जा योजना, शेतीमालाला हमीभाव दिला. हमीभावाची रक्कम वाढवली. किसान सन्मान निधीचा सोळावा हप्ता जनतेच्या खात्यावर जमा केला. अशा अनेक योजनांचा समावेश आहे. काँग्रेस राष्ट्रवादीने फक्त टीका केल्या. शरद पवारांना योजनांची आकडेवारी वाचून दाखवा. मराठा आरक्षणाचा शत्रू देखील तेच आहेत. बारामतीत सुप्रिया सुळेचे डिपॉझिट जप्त होणार आहे. त्यांना गल्लोगल्ली फिरावे लागत आहे. राहुल गांधी नंदुरबार मध्ये आहेत. सावरकरांचा अपमान करणे हा त्यांचा एक कलमी कार्यक्रम आहे. असे बावनकुळे यांनी स्पष्ट करीत मोदी आता तिसऱ्यांदा शपथ घेतील. किसान मोर्चा परिक्रमा यात्रा दोन लक्ष गावात निघाली. या यात्रेतून शेतकऱ्यांच्या अडचणी समोर आल्या. त्यांच्या सूचना आल्या. त्याला सरकार न्याय देणार असल्याचे सांगितले. महामंत्री विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनीही मार्गदर्शन केले. विभागातल्या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या शंभर कार्यकर्त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

**किसान परिक्रमा यात्रेतून शेतकऱ्यांच्या योजना घराघरापर्यंत पोचल्या. प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान केला. साडेचार हजार गावात यात्रा फिरली. वर्षाला ३८ हजार शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात पैसे जमा केले. शेतकऱ्यांचा विकास हेच सरकारचे धोरण आहे. शेतकरी, युवक, महिलांना बळकटी हाच मोदींचा प्रयत्न आहे.**

**- गणेश बेगडे, प्रदेशाध्यक्ष किसान मोर्चा**

**दहा वर्ष मोदी सरकार विविध योजनेद्वारे काम करीत आहे. शेतकऱ्यांच्या अनेक योजना सर्वत्र पोहोचल्या. मात्र अगोदरच्या काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा ठेवला. आश्वासन देत शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. कराड उत्तर मध्ये २५ वर्ष बिनकामाचे आमदार ठाण मांडून आहेत. कारखान्याच्या माध्यमातून पिळवणूक सुरू आहे. आता कराड उत्तरचा आमदार हा भाजपचाच असेल.**

**- रामकृष्ण वेताळ., किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस**

**ग्राम परिक्रमा यात्रेचा शुभारंभ मसूर विभागातून व समारोपही मसूर भागातून होत आहे. किसान मोर्चा आघाडीचे काम चांगले सुरू आहे. योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घेतला. शेतकऱ्यांचा आर्थिक विकास केंद्र व राज्य सरकारने केला. कराड उत्तरचा पूर्व भाग दुष्काळी राहिला. तो फुलवण्यासाठी भाजपचे कमळ फुलवण्याची संधी लोकांनी द्यावी.**

**- मनोज घोरपडे, कराड उत्तर विधानसभा निवडणूक प्रमुख.**

## सोनके गावचे सुपुत्र सुनील धुमाळ यांचे आज प्रथम पुण्यस्मरण



**वाठार स्टेशन** : सोनके ता. कोरेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुनील शामराव धुमाळ भाऊ यांचे उद्या शनिवार १६ मार्च रोजी प्रथम पुण्यस्मरण आहे शनिवारी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प योगेश महाराज यादव सोळशी यांचे फुलाचे कीर्तन होणार आहे.

या कार्यक्रमासाठी आप्तेष्ट व सर्व मित्र परिवाराने हजर राहावे असे आवाहन धुमाळ कुटुंबीयांनी केले आहे.

## सूर्य योजना फायद्याची : अमित बोकील

**वाई** : प्रधानमंत्री मोफत सूर्य घर योजनेसाठी सुरुवातीस करावा लागणारा खर्च अधिक वाटत असला तरी, नंतर होणारी बचत व वीज विक्रीचे उत्पन्न,यांमुळे योजना घरगुती ग्राहकांच्या फायद्याची आहे,असे प्रतिपादन विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता अमित बोकील यांनी केले.

येथील लोकमान्य टिळक स्मारक संस्थेने उभारलेल्या ६ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा संयंत्राचे उद्घाटन व वीज ग्राहक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, टिळक स्मारक संस्था व मकरंद पत्रकार प्रतिष्ठान (वाई) यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बोकील म्हणाले, सूर्य घर योजनेत किलो वॅटला ३० हजार तर २ किलोवॅटला ६० हजार रुपये अनुदान मिळणार आहे. दिवसेंदिवस विजेची गरज, मागणी वाढणार आहे. त्यामुळे टिळक ग्रंथालयाने सौर ऊर्जा संयंत्र उभारून सर्वांपुढे उदाहरण ठेवले आहे. उपकार्यकारी अभियंता पंकज गोंजारी म्हणाले, सौर ऊर्जा ही अखंड आणि नवीकरणीय ऊर्जा आहे. पर्यावरणपूरक व प्रदूषण टाळणाऱ्या वीज निर्मितीद्वारे



दरमहा १००० रुपये वीज विक्रीतून उत्पन्न मिळणार असल्याचे सांगितले.

टिळक स्मारक संस्थेचे अध्यक्ष यांनी अध्यक्षीय समारोपात सौदामिनी व लक्ष्मी यांची निर्मिती करणारी योजना असल्याने लाभ घेण्याचे आवाहन केले.ग्राहकांनी विचारलेल्या उत्स्फूर्त शंकांची श्री.बोकील श्री.गोंजारी व चिरायू सोलरचे प्रदीप वीरकर यांनी उत्तरे दिली. उपाध्यक्ष दत्ता मर्ढेकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यवाह भद्रेश भाटे, विश्वस्त शिवाजी कदम, आनंद शेलार यांनी स्वागत, विठ्ठल माने यांनी सूत्रसंचालन,विवेक पटवर्धन यांनी आभार मानले.

## परळी खोऱ्यातील वनविभागाचे उपकार्यालय स्फोटामुळे हादरले

### कार्यालयाच्या भिंतींना तडे, गावठी गोळा फुटल्याचा दावा

**सातारा** : परळी तालुका सातारा येथील वनविभागाच्या उपकेंद्राशेजारील भंगाराच्या गोडाऊनमध्ये गावठी गोळ्याचा स्फोट होऊन कार्यालयाचा पत्रा उडून पडल्याची घटना, बुधवारी सकाळी घडली . वनविभागाने घटनास्थळाचा पंचनामा केला आहे . या घटनेत अंदाजे एक लाख रुपयाचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले

मात्र या स्फोटामुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते गुरुवारी सकाळी परळी वनविभागाच्या कार्यालयामध्ये जोरदार स्फोट झाल्याने परिसरामध्ये भीतीने वातावरण निर्माण होऊन उलट सुलट चर्चांना सुरुवात झाली . घटनास्थळावर कार्यालयाच्या लगतच्या भिंतीला तडे जाऊन छप्पराचा काही भाग उडून जमिनीवर पडला होता घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी झाली सातारा तालुका आणि सातारा वनविभाग यांनी घटनास्थळाला भेट देऊन तातडीने पंचनामा केला

यासंदर्भात वनविभागाच्या सूत्रांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की परळी खोऱ्यामध्ये रानडुकराच्या शिकार प्रकरणातील मुद्देमाल जप्त करून कार्यालयाच्या पिछाडीला असणाऱ्या बंदिस्त जागेत ठेवण्यात आला होता त्या गावठी गोळ्याचा स्फोट झाला .सुदैवाने या घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही कार्यालयांमध्ये वनविभागाचा एकही कर्मचारी त्यावेळी उपस्थित नव्हता रानडुकराच्या शिकारीचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे मुद्देमाल सुस्थितीत आणि जबाबदारीवर ठेवणे आवश्यक होते मात्र स्फोट कसा झाला या संदर्भामध्ये निश्चित माहिती मात्र मिळू शकलेली नाही परळी खोऱ्यात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# क्राईम

## दोन वेगवेगळ्या घटनेत तीन जण बेपत्ता

सातारा : सातारा शहरासह तालुक्यात घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनेत तीन जण बेपत्ता झाल्याच्या नोंदी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास सातारा एसटी स्टँड येथून वडूज येथे राहणारी विवाहिता तिच्या अल्पवयीन मुलीसह बेपत्ता झाली आहे.

दुसऱ्या घटनेत, दि. १२ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास नागेवाडी फाटा ता. सातारा येथून लिंब, तालुका सातारा येथील एक २३ वर्षीय युवती बेपत्ता झाली आहे.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

सातारा : गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास अजिंक्य गणेश चव्हाण रा. पानमळेवाडी, ता. सातारा याने गावाच्या हद्दीतील शिवारात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कुमठेकर करीत आहेत.

## मारहाण केल्याप्रकरणी महिलेवर गुन्हा

सातारा : मारहाण केल्याप्रकरणी महिलेविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पोवई नाका येथील एका कपड्याच्या दुकानाबाहेर अफसाना हनीफ पठाण रा. विकास नगर सातारा यांना मारहाण केल्याप्रकरणी राणी राजा देशमुख रा. शाहूनगर, सातारा यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मते करीत आहेत.

## जुगार प्रकरणी दोघांवर कारवाई

सातारा : जुगार प्रकरणी सातारा शहर पोलिसांनी दोघांवर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास किरण नागनाथ उकिर्डे रा. प्रतापसिंह नगर खेड आणि शाहरुख असलम शेख रा. मोळाचा ओढा, सातारा हे चंदन नगर, कोडोली येथील एका हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या टपरीच्या आडोशास जुगार घेताना आढळून आले. त्यांच्याकडून बाराशे रुपये रोख व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

## महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी एका विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक आठ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास माने कॉलनी, कोडोली येथे राहणाऱ्या विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी अस्लम मुलाणी (संपूर्ण नाव माहित नाही) रा. कारंडवाडी, तालुका सातारा यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिरोळे करीत आहेत.

## जबरी चोरी प्रकरणी तीन अज्ञातांवर गुन्हा

सातारा : जबरी चोरी प्रकरणी तीन अज्ञातांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी संध्याकाळी ७ ते रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान आतिष अतुल राक्षे सध्या राहणार कोडोली सातारा यांना तीन अज्ञातांनी हॉटेल मनोज येथून त्यांच्याकडील मोटरसायकलवर जबरदस्तीने बसवून जानाई मळाई डोंगराच्या पायथ्याला घेऊन जाऊन, मारहाण करून त्यांच्या खिशातील मोबाईल व रोख रक्कम असे एकूण चार हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जबरी चोरी करून घेऊन गेले आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मोरे करीत आहेत.

सातारा शहर परिसरात जबरी चोरी

सातारा : सातारा शहर परिसरात जबरी चोरी झाल्याची नोंद शाहूपुरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सिध्दनाथ वाडीतील विविध विकास कामांचे भुमिपुजन

**वाई** : गुरे बाजार झोपडपट्टी रहिवासी संकुलात गटारे ,पाईपलाईन व चेंबर बांधकाम, गंगापुरी पाणवठा रस्ता, सिद्धनाथवाडी दशक्रिया विधी कट्टा आदी विकास योजनांचे भूमिपूजन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील यांच्या हस्ते झाले.

पंचायत समितीचे माजी उपसभापती विक्रांत डोंगरे, माजी नगराध्यक्ष भूषण गायकवाड,भारत खामकर, राजेश गुरव, संजय चव्हाण,सुधीर खरात, मोहन जायगुडे, वामन खरात, जयवंत कचरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार मकरंद पाटील यांच्या प्रयत्नातून, सनी चव्हाण व सायली कट्टा मित्रपरिवाराच्या पाठपुराव्यातून ही कामे मंजूर करण्यात आली आहेत. पाणवठा रस्ता व दशक्रिया विधी कट्ट्यासाठी ८ लाख१६ हजार, गुरे बाजार झोपडपट्टी रहिवासी संकुलातील नवीन गटारे,चेंबर व पाइपलाइन कामांसाठी १८ लाख ९० हजार अशा २७ लाख ६ हजार रुपयांच्या



कामांची सुरुवात करण्यात आली. यावेळी नितीन पाटील यांच्या लोकसभेच्या उमेदवारीची मागणी एकमुखाने करण्यात आली.

नितीन पाटील म्हणाले, आमदार मकरंद पाटील यांनी गरज पाहून सर्व वंचित वस्त्यांमध्ये विकासाच्या योजना पोहोचविण्यासाठी जबाबदारीने पाठपुरावा केला आहे. वाई पालिकेच्या मुख्याधिकारी संजीवनी दळवी, किरणकुमार मोरे, अभियंता सचिन भधेंडे यांनी मंजुरीसाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य केल्याचे सनी चव्हाण यांनी सांगितले.

उमेश जायगुडे, मोहन घाडगे, बापूराव खरात, हणमंत दुधाणे, शामराव खरात, उत्तम घाडगे, अवि मोरे, नितीन चौरे, विनोद चव्हाण, प्रसाद कचरे, राहुल जायगुडे, नारायण बरकडे, शंकर वाघ यांनी स्वागत केले.

यावेळी बंटी खरात, राजू कारळे, सुनील पवार, शिवाजी पवार, प्रसाद सुळके, मयूर खरात, शंकर नाना जायगुडे, दीपक जायगुडे, रमेश जायगुडे, युगल घाडगे, प्रकाश खरात, नामदेव चौधरी, मनोज सुळके, धनु खरात, लक्ष्मण खरात, विलास राजपुरे, नंदकुमार निकम, अक्षय घाडगे, महेंद्र ढगे, नितीन चौधरी, नागरिक व युवक उपस्थित होते.

## राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी साताऱ्यातील २ खेळाडूंची निवड

**सातारा** : अकोला येथे नुकत्याच झालेल्या सब ज्युनिअर मुले आणि मुली राज्यस्तरीय निवड चाचणी बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सातारा बॉक्सिंग अकॅडमीच्या समृद्धी सतीश शिंदे (५२ ते ५५ किलो) आणि रुद्रनील निलेश पवार (७०+ किलो) या खेळाडूंनी सातारा जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावले. या दोघांचीही नोएडा, उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली.

१८ ते २४ मार्च २०२४ दरम्यान नोएडा उत्तर प्रदेश येथे ३ री सब ज्युनियर मुले/ मुली राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा होणार आहे. यासाठी साताऱ्यातील या दोन खेळाडूंची निवड झाली आहे. या खेळाडूंना बॉक्सिंग प्रशिक्षक सागर जगताप, संघ प्रशिक्षक श्रावणी बर्गे यांचे मार्गदर्शन लाभले.

दोघांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

सातारा जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे, योगेश मुंदडा, अकॅडमीचे पदाधिकारी जगन्नाथ जगताप, हरीश शेट्टी, अमर मोकाशी, रवींद्र होले, संतोष कदम, तेजस यादव, बापूसाहेब पोतेकर, सतीश शिंदे, निलेश पवार, मधुकर पवार, वैशाली शिंदे, अश्विनी पवार आदींनी दोघांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सातारा रत्नागिरी रूटवर जुनी बस सोडल्यास खबरदार

### सुहास राजेशिर्के यांचा सातारा आगाराला इशारा

सातारा : उन्हाळी सुट्ट्या आणि आगामी होळी सणाच्या पार्श्वभूमीवर सातारा रत्नागिरी ही बंद पडलेली बस सातारा आगारातर्फे पुन्हा १७ मार्चपासून सुरू करण्यात येत आहे .सातारा आगाराला दहा लाख रुपयांचे उत्पन्न देणाऱ्या या मार्गावर तांत्रिकदृष्ट्या नादुरुस्त अथवा जुनी बस सोडल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा खासदार उदयनराजे भोसले यांचे कट्टर समर्थक व येसूबाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी दिला आहे.

सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी या प्रश्नासंदर्भात तातडीने लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा अशी मागणी त्यांनी केली आहे. सातारा जिल्ह्यामध्ये कोकणातून येऊन स्थायिक झालेल्या कोकण बांधवांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे सातारा शहराच्या पश्चिम भागामध्ये ही संख्या लक्षणीय आहे .कोविड नंतरच्या काळामध्ये कुणबी समाज संघ सातारा यांच्या मागणीप्रमाणे सातारा आगाराचे विभाग नियंत्रक सागर पळसुले यांनी सातारा रत्नागिरी गाडी नियमितपणे सुरू केली होती. मात्र या मार्गासाठी नवीन बस उपलब्ध नसल्याने जुन्या नादुरुस्त गाड्यांवर हा रूट सुरू ठेवण्याची नामुष्की सातारा आगारावर ओढवली होती.

सुहास राजेशिर्के व कुणबी समाज संघ सातारा यांचा सातारा आगाराच्या गाडीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. साधारण तीन महिन्यापूर्वी सातारा आगाराने कुणबी समाज संघाच्या मागणीची दखल घेऊन सातारा रत्नागिरी गाडी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी सुरू केली होती मात्र हवेत धूर सोडणे वारंवार गाडी बंद पडणे गाडीचा पाटा तुटणे यामुळे प्रवासी आणि वाहक यांच्यामध्ये वारंवार वादावादीचे प्रसंग घडत होते किमान १५ दिवस कशीबशी सुरू असलेली सातारा रत्नागिरी बस सेवा नवीन गाड्यांच्या अभावामुळे पुन्हा बंद पडली. सुहास राजेशिर्के व कुणबी सातारा समाज यांच्या वतीने पुन्हा झालेल्या पाठपुराव्यामुळे विभाग नियंत्रक सागर पळसुले यांनी सातारा रत्नागिरी गाडी पुन्हा दि १७ मार्च पासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेतप तसेच या बससाठी आगाऊ नोंदणीची सुविधा सुध्दा उपलब्ध झाली आहे

मात्र यावेळी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची सातारा आगाराने नादुरुस्त गाड्या पाठवून जर चेष्टा केली तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडावे लागेल असा इशारा सुहास राजेशिर्के यांनी दिला आहे . शिवाई ईबसे मुंबई पुण्याला मिळतात मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा असलेल्या साताऱ्याला मात्र मिळू शकत नाही हे दुर्दैव आहे. पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने दळणवळणाच्या या गंभीर प्रश्नांमध्ये तातडीने लक्ष घालावे अशी मागणी राजेशिर्के यांची आहे .आगामी उन्हाळी सुट्ट्या तसेच होळीच्या सणासाठी साताऱ्यातील कोकणस्थ बांधवांना जाण्यासाठी सातारा रत्नागिरी ही बस १७ तारखेपासून सुरू होणार आहे मात्र ती बस नवी आणि व्यवस्थित असावी अशी प्रवाशांची अपेक्षा आहे सातारा आगाराच्या विभाग नियंत्रकांनी यासंदर्भात नवीन बस उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा सुहास राजेशिर्के व कुणबी समाज संघ सातारा यांनी दिला आहे.

## सातारा लोकसभेचा उमेदवार भाजपचाच असेल

### भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची रात्री उशिरा साताऱ्यात खलबते

**सातारा** : गेल्या दोन वर्षापासून सातारा जिल्हयात भाजपने चांगली राजकीय बांधणी केली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विकास योजनांच्या अंमलबजावणीसह भाजप प्रदेश कार्यकारीणीचे कार्यक्रम सातारा जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यात आले आहेत. जिल्ह्यात भाजपला राजकीय वातावरण अनुकूल असून येत्या लोकसभा निवडणुकीत सातारा लोकसभेसाठी भाजपचाच उमेदवार दिला जाईल अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी साताऱ्यात दिली.

भा.ज.पा. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे कराड तालुक्यातील बेलवडे या गावी एका कार्यक्रमासाठी आले होते, त्यानंतर साताऱ्यात भाजपच्या सातारा कोअर कमिटीची बैठक घेऊन मार्गदर्शन केले.

भाजपा किसान मोर्च्याच्या ग्रामपरिक्रमा अभियानाच्या सांगता समारोपाच्या कार्यक्रमासाठी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, किसान मोर्च्या प्रदेश अध्यक्ष गणेशजी भेगडे, जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम, प्रदेश उपाध्यक्ष विक्रमजी पावसकर, मनोजदादा घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपक्रमाचा आढावा घेऊन कार्यक्रमाची सांगता केली.

त्यानंतर अचानक भा.ज.पा. सातारा कोअर कमिटीला बैठकीचे निरोप दिले गेले आणि रात्री १०.३० ते १२.३० यावेळात सातारा येथील हॉटेल लेक व्ह्यू येथे कोअर कमिटी बैठक झाली. भा.ज.पा. प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी सातारा लोकसभे बाबत कोअर कमिटी मधील सर्व सदस्यांची वैयक्तिक मते ऐकून घेतली, सर्वांनीच सातारा लोकसभा ही भा.ज.पा. च्या कमळ याच चिन्हावर लढविण्याचा आग्रह धरला होता, जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांनी सातारा जिल्ह्यातील भाज पा च्या पदाधिकारी कार्यकर्त्यांचे कामं पूर्ण जिल्ह्यात, प्रत्येक बूथ वर शेवटच्या घटकापर्यंत पोचल्याची खात्री करून दिली साताऱ्यासाठी भाजपचा उमेदवार दिला जाईल अशी स्पष्टोक्ती बावनकुळे यांनी दिली.

आपल्या मार्गदर्शन समारोपत भा.ज.पा. प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी, सर्वांनी महायुतीचे कामं पूर्ण क्षमतेने करावे, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना पाठिंबा देणारा खासदार सातारा लोकसभेतून निवडून देण्यासाठी प्रयत्न करावेत, पक्षाने दिलेला संदेश घरोघरी पोचवावा, प्रत्येक मतदारांशी संपर्क करावा असे सांगून,केंद्र सरकारच्या योजना, राज्य सरकारच्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोचवण्याचे कामं केल्याबद्दल सर्व भा.ज.पा. कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आणि भा.ज.पा. कार्यकर्ते, पदाधिकारी, कोअर कमिटी सदस्यांच्या भावना विचारात घेऊन लवकरच सातारा लोकसभे बाबत निर्णय जाहीर केला जाईल असे खात्रीलायक सांगितले

या कोअर कमिटी बैठकीसाठी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम, प्रदेश उपाध्यक्ष विक्रमजी पावसकर,खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, कोरेगावच्या प्रियाताई महेश शिंदे, मनोजदादा घोरपडे, लोकसभा संयोजक सुनीलतात्या काटकर, वाई विधानसभा निवडणूक प्रमुख सुरभी भोसले, सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम, माढा लोकसभा संयोजक जयकुमार शिंदे सर्व विधानसभा निवडणूक प्रमुख, कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# पाण्यासाठी शिरोळकरांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना धरले धारेवर

## मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन केले स्थगित



कुरुंदवाड येथे थक बाकी वसुलीसाठी आस्थापना टाळे ठोकताना पालिकेचे कर्मचारी.



शिरोळ नगरपालिकेसमोर हे आंदोलन करताना नागरिक.

**शिरोळ :** शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी गुरुवारी नागरिकांनी नगरपालिकेवर मोर्चा काढून अधिकाऱ्यांना धारेवर धरले. एक दिवसआड व स्वच्छ पाणी पुरवठा न केल्यास दुषित पाणीआल्यास अधिकाऱ्यांना दुषित पाणी पाजण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला. यावेळी मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव यांनी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यापुर्वी नागरिकांनी आंदोलन अंकुशचे प्रमुख धनाजी चुडमुंगे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेवर घागर मोर्चा काढून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली होती. त्यानंतरही वेळेत पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांनी पालिकेला टाळे ठोकण्याचा इशारा दिला होता. गुरुवारी संभाजी चौक येथे नागरिक एकत्र आले त्यानंतर हा मोर्चा पालिकेवर आला. त्याठिकाणी ठिय्या आंदोलन करुन शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा व कोणत्याही गल्लीत दुषित पाणी आले तर अधिकाऱ्यांना दुषित पाणी पाजण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. शहरात स्वच्छता होत नाही, दिड ते दोन कोटी रुपये स्वच्छतेवर खर्च होत असताना त्याकडे आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप यावेळी आंदोलनकर्त्यांनी केला. यावेळी मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव यांनी नागरिकांच्या समस्या निश्चितच दूर केल्या जातील. पाण्याचेही नियोजन केले जाईल पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी लाईट गेली तरी पर्यायी व्यवस्था म्हणून कृष्णा नदीवर जनरेटर नेऊन बसून आता आला आहे त्यामुळे

जॅकवेलवर २४ तास पाणी उपसा सुरु राहून किमान एक दिवस आड पाणी येऊ शकेल

त्याचबरोबर कृष्णा नदीची पाणी पातळी कमी झाली तर पाणी उपसा करायला आणखी एका तरफ्यावरील मोटरीची गरज होती तीही मोटर नगरपरिषदने रात्रीत आणून त्याची आज ट्रायल पण घेतली आहे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने औषध फवारणी सुरु झाली

घंटागाडी दररोज येत आहे

दररोज गटारी साफ करून कचरा उचलण्यास सुरुवात झाले आहे आहे. तसेच जनतेच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी नगरपरिषद प्रशासन योग्य कारवाई करण्याचे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले यामुळे टाळे ठोक आंदोलन स्थगित करण्यात आले

सदर आंदोलनात धनाजी चुडमुंगे, महेश जाधव, कृष्णात गावडे, एकनाथ माने, शहाजी गावडे, शशिकांत काळे, राहूल माने, दिपक काळे, बाबू मोरे, अजित देशमुख यांच्यासह महिला सहभागी झाल्या होत्या.

# अंबाबाई मूर्तीबाबतचा अहवाल २५ ला सादर होणार! सलग दुसऱ्या दिवशी मूर्तीची पाहणी

**कोल्हापूर:** करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी तज्ञांनी पाहणी केली. मूर्तीबाबतचा सविस्तर अहवाल २५ तारखेला न्यायालयाला सादर करण्यात येणार आहे. याविषयावरील पुढील सुनावणी ४ एप्रिलला होणार असून त्यात या अहवालावर चर्चा होईल.

करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची मोठी झीज झाली असून मूर्तीवरील संवर्धनाचा लेप गळून पडत आहे. त्या पार्श्वभूमीवर न्यायालयीन आदेशाने गेल्या दोन दिवसांपूर्वी पुरातत्व विभागाचे निवृत्त अधिकारी आर. एस. त्र्यंबके व विलास मांगिराज यांनी मूर्तीची पाहणी केली. शुक्रवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत ही पाहणी झाली. यावेळी स्वत: जिल्हाधिकारी अमोल येडगे, पुरातत्व विभागाचे



सहसंचालक विलास वहाने यांच्यासह ड, प्रसन्न मालेकर, दिलीप देसाई यांच्यासह वादी प्रतिवादी उपस्थित होते.

हे अधिकारी अंबाबाई मूर्ती पाहणीचा आपला अहवाल २५ मार्च रोजी न्यायालयाला सादर करणार आहेत. याविषयावरील पुढील सुनावणी ४ एप्रिल रोजी होणार असून त्यादिवशी अहवालावर चर्चा होईल.

### यासाठी पुन्हा माझ्याकडे यायचं नाही

# अजित पवारांनी स्पष्टच सांगितले

**बारामती :** नानाच्या (विश्वास देवकाते) एका ओळखीच्या माणसाला मोक्का लागत होता. मला सगळ्यांनी सांगितले. वेगवेगळे सहकारी आले. त्यांनी सांगितलं, दादा एवढ्या वेळेस वाचवा. त्याचवेळी सांगितले, एवढीच वेळ, पण पुन्हा जर त्या मार्गाला लागला, परत चुकला तर पुन्हाअजित पवारांकडेत्या कारणासाठी यायचं नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्रीअजित पवारयांनी गुरुवारी निरावागज येथे मिश्कीलपणे सांगितलेला किस्सा चर्चेत आला आहे. परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वास देवकाते यांच्या गावात सभेत पवार बोलत होते. पवार म्हणाले, अधिकारी मला म्हणतात की, दादा तुम्ही एवढे कडक बोलता आणि यांना कसे पाठीशी घालता? यामध्ये शेवटी माझाही कमीपणा होतो. पण जिवाभावाची माणसं, म्हणून मलाही थोडेफार यामध्ये माघारी फिरावे लागते. मात्र, आता तसं कोणी होऊ देऊ नका, चुकीचे कोणीच वागू नका, असे आवाहन त्यांनी केले. .



# पन्हाळा तालुक्यातील अंगणवाडी सेविकांना बाल विकास प्रकल्प विभागाकडून स्मार्ट मोबाईलचे वाटप



अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षकांना स्मार्ट मोबाईल फोनचे वाटप करताना बाल विकास प्रकल्प अधिकारी नयना पाटील.

**पन्हाळा :** पन्हाळा तालुक्यातील अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षकांना स्मार्ट मोबाईल फोनचे बाल विकास प्रकल्प विभागाकडून वाटप करण्यात आले.

शासनाकडून चार वर्षांपूर्वी वाटप केलेले मोबाईल फोन जुने व खराब झाल्याने सेविकांना काम करताना अडचणी निर्माण होत होत्या.ही समस्या लक्षात घेऊ नवीन स्मार्ट मोबाईल फोनचे वाटप करण्यात आले आहेत. नवीन मोबाईलमुळे गैरसोय व मन:स्ताप दूर होणार असल्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी नयना पाटील यांनी सांगितले.

सेविकांनी केलेल्या आंदोलने व मोर्चामध्ये स्मार्टफोनची मागणी सातत्याने केली जात होती. यापूर्वी २०१९ साली फोनचे वाटप केले होते. ते फोन खराब जमाकरून घ्यावेत व दुसरे फोन मिळावेत या मागणी साठी सेविकांनी आंदोलन देखील केले होते. ती मागणी पूर्ण झाली केली असून आता नवीन स्मार्टफोनमुळे सेविकांना ऑनलाईन करावयाच्या कामांमध्ये गती येणार आहे. तसेच सेविकांची होणारी गैरसोय कमी होणार आहे. त्यामुळे सेविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळीं बीट पर्यवेक्षकां सुनंदा कोष्टी, अश्विनी पाटील, रशिदा अत्तार, सुशील भोसले, सुशीला मर्दाने, रखीयाबानू मुल्लाणी यांच्यासह राहुल कांबळे , जयश्री जगताप व तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या..

# पन्हाळ्यात बोगस सही शिक्यांच्या प्रकरणी पत्रकार परिषद

**पन्हाळ ा:** पन्हाळा उपविभागातील पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यातून घेतलेल्या बांधकाम परवाने, बिगरशेती आदेश,सर्वच प्रकारचे जातीचे दाखले पक्षकारांनी आपले परवाने, दाखले तहसील व प्रांत कार्यालयातून तपासून घ्यावेत. त्यामध्ये परवाने अगर दाखले बोगस आढळले तरी त्याबाबत फसवणूक झालेल्या पक्षकारांना दोषी ठरवले जाणार नाही. अशी ग्वाही पन्हाळा प्रांतधिकारी समीर शिंगटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषदेला संबोधित करताना प्रांतधिकारी समीर शिंगटे व तहसीलदार माधवी शिंदे -जाधव.

पुढे बोलतांना ते म्हणाले,तपासणीत दाखला अथवा परवाना बोगस मिळालेले पक्षकार दोषी नसतात. त्यांची असे बोगस परवाने,दाखले देऊन फसवणूक झाली असते. त्यामुळे फसवणूक झालेल्या पक्षकारांनी दाखला ज्याचे कडून घेतला त्या महा ई सेवा केंद्राचे अथवा एजेंटाबाबत न भिता माहिती दिली पाहिजे. त्या आधारेच आम्हास दोषीपर्यंत पोहचता येईल.व त्याला शासन करता येईल व त्यांची टोळी प्रकाशात आणण्यासाठी मदत होईल.साध्या चर्चेत असलेले प्रकरण फक्त बोगस बांधकाम परवान्या पुरतेच मर्यादित राहिलेले नाही. त्याकामी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या पोलीस तपासात विविध प्रकारचे दाखलेही बोगस असलेचे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये जातीचे ,नॉन क्रिम्लिअर,बिगरशेती आदेशासाठी लागणारे दाखले व जात पाडताळणी दाखल्यांचा देखील समावेश आहे.आत्तापर्यंत केलेल्या तपासणीत १८ कुणबी जातीचे दाखले आढळले आहेत. तर एका जात पडताळणी दाखल्याची पडताळणी चालू आहे.या पार्श्र्भूमीवर महा ई केंद्र तपासणी चालू केली आहे. पण या बोगस गिरी प्रकरणात दोन्ही तालुक्यात मोठी टोळी कार्यरत असण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे ती टोळी प्रकाशात आणण्यासाठी जनतेतूनही सहकार्य अपेक्षित आहे. त्यासाठी ज्यांनी जातीचे अगर अन्य दाखले अथवा परवाने घेतले असतील त्यांनी त्याची सत्यता पडताळून घेणे गरजेचे आहे.या पत्रकार परिषदेला तहसीलदार माधवी शिंदे -जाधव निवासी नायब तहसीलदार संजय वळवी उपस्थीत होते.

चालू बोगस गिरी प्रकरणात चार आरोपी अटकेत आहेत. तर एक महा ई सेवाचालक अद्याप फरार आहे.त्याचे ताब्यातील व वापरातील सर्व साहित्य ताब्यात घेतले असून त्याची पडताळणी चालू आहे.

# बार्टीच्या मागासवर्गीय पीएचडी संशोधकांवर अन्याय,आमदारांचे मौन

**मुंबई :** अनुसूचित जातींमधील २०२२ सालातील पीएचडीचे ७६३ संशोधक फेलोशीपसाठी गेले तब्बल पाच महिने घरदार, कुटुंब,अभ्यास वाऱ्यावर सोडून लढत आहेत. 'आझाद मैदानातील मागासवर्गीय आक्रोशाचे प्रतिबिंब येत्या रविवारी (१७ मार्च) काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या मुंबईतील न्याय गर्जना सभेत पडेल काय,' असा सवाल सारे संशोधक करू लागले आहेत. मागासकीवर्गीय विद्यार्थी फेलोशिप प्रश्नाबाबत राखीव जागेतून निवडून आलेल्या आमदारांनी मौन धरण केले आहे. अशा आमदारांना पुन्हा विधानसभेची उमेदवारी देणारे पक्ष हे जातीवादी पक्ष म्हणून घोषित करावे अशी मागणी या वेळेला श्री गायकवाड यांनी केली आहे.

बार्टीने पात्र ठरवून निवडलेल्या त्या विद्यार्थ्यांना फेलोशीपपासून दोन वर्षे वंचित ठेवण्यात आले आहे. राखीव जागेतून निवडून आलेले सर्वपक्षीय सर्वपक्षीय आमदार यांना या प्रश्नाचे गांभीर्य नसल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. हुशार विद्यार्थ्यांना फेलोशिप घेऊन एखाद्या विषयाबाबतचे संशोधन करण्यासाठी त्यांना आर्थिक पाठ्य बळ दिले जाते. पण सध्या शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संधी देऊ नये अशाच पद्धतीने धोरण राबवले जात आहे.

त्या संशोधकांच्यावतीने फेलोशिपच्या प्रश्नाकडे राहुल गांधी यांचे लक्ष ज्येष्ठ पत्रकार आणि दलित चळवळीतील आघाडीचे सामाजिक कार्यकर्ते दिवाकर शेजवळ यांनी ई मेलद्वारे एक पत्र पाठवून वेधले आहे.

काँग्रेसचे नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर मल्लिकार्जुन खारगे आणि महाराष्ट्राच्या राजधानीत आमदार प्रा. वर्षा गायकवाड हे दलित नेते करत आहेत. असे असतानाही पक्षातील कुण्या नेत्याने दलित संशोधकांवरील महाराष्ट्र सरकारचा घोर अन्याय आपल्यापर्यंत पोहोचवला काय ?, असा सवाल त्या पत्रात विचारण्यात आला आहे. त्या पत्राची प्रत सोनिया गांधी आणि खारगे यांनाही शेजवळ यांनी पाठवली आहे

शिक्षण हे राज्य सरकारचे घटनात्मक कर्तव्य आणि जबादारी आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच केले आहे. तरीही राज्य सरकार अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि फेलोशीप नाकारून आपली घटनात्मक जबाबदारी झिडकारत आहे, असेही त्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

सारथी या संस्थेने २०२२ च्या ८५१ मराठा विद्यार्थ्यांना २१ सप्टेंबर २०२२ च्या पत्रानुसार फेलोशीप मंजूर करून रक्कम त्यांच्या खात्यात जमाही केलेली आहे. तसेच ' महाज्योती ' या संस्थेनेसुद्धा १ हजार २२६ ओबीसी विद्यार्थ्यांना २ नोव्हेंबर २०२२ च्या पत्रानुसार फेलोशिप मंजूर करून रक्कम त्यांच्या खात्यात जमा केली आहे. इतकेच नव्हे तर, सारथी आणि महाज्योती या दोन्ही संस्थांनी २०२३ सालातील विद्यार्थ्यांसाठी जाहिरातीही प्रसिद्ध केल्या आहेत. मग तोच न्याय बार्टीकडील अनुसूचित जातींच्या २०२२ च्या ७६३ संशोधकांना का नाही? अनुसूचित जातींमधील फेलोशीपच्या लाभार्थींच्या संख्येला कात्री लावण्यास महाराष्ट्र सरकार का टपले आहे, असा सवाल आझाद मैदानात धरण्याला बसलेले संशोधक विचारत आहेत.



आरपीआय उमेदवार संजय गाडे यांचा जाहीरनामा मतदारांपर्यंत पोहोचवताना युवक नेते आदित्य गायकवाड व मान्यवर (छाया- अजित जगताप, सातारा)

# सातारा लोकसभा निवडणुकीत गवई गटाचे श्री गाडे यांचे अस्तित्व दाखवू : आदित्य गायकवाड

**सातारा :** सध्या भारत देशात निवडणुकीचे वारे वाहत आहे. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून कार्यरत राहण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) नेहमी तत्पर असतो .यंदा सातारा लोकसभा मतदारसंघातून गवई गटाचे आरपीआय जिल्हा अध्यक्ष संजय गाडे यांची मतदारांनीच निवड केली आहे. त्यामुळे आरपीआयचे या निवडणुकीत अस्तित्व दाखवून देऊ असे प्रतिपादन आरपीआय गवई गटाचे सातारा युवक जिल्हाध्यक्ष आदित्य गायकवाड यांनी केले आहे. सातारा येथे झालेल्या युवक मेळाव्यात कार्यकर्त्यांना सूचना करताना ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते चंद्रकांत कांबळे होते.

प्रमुख राजकीय पक्ष हे नेहमीच घटक पक्षाला अस्पृश्य समजून वागणूक देत होते. पण, निवडणुका आल्या की, पोस्टर, बॅनर व प्रसिद्ध साहित्यवर फक्त आरपीआय नेत्यांचे फोटो छापले म्हणजे आपली जबाबदारी मिटली. असे ते समजत होते. या गोष्टीला कंटाळलेल्या दलित -पददलित -- कष्टकरी अल्पसंख्याक व महिलावर्ग यांनी आता बंड नव्हे तर थंड डोक्याने विचार करून आमचे मार्गदर्शक श्री संजय गाडे यांनी सातारा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक लढवावी. अशी भूमिका मांडली. त्याला एकमुखी पाठिंबा दिल्यानंतरच श्री संजय गाडे हे निवडणूक लढवले तयार झालेले आहेत.

गेल्या वेळेला भारतीय जनता पक्षाने खासदार उदयनराजे भोसले यांना निवडणूक सोपी जावी .यासाठी जाणीवपूर्वक सातारा लोकसभा मतदारसंघाची जागा ही आरपीआय आठवले गटाला सोडली. या वेळेला आरपीआयचे उमेदवार अशोक गायकवाड यांना ७६ हजार एवढे मतदान झाले. हे मतदान या वेळेला श्री संजय गाडे यांना नक्कीच मिळणार आहे. किंबहुना त्यामध्ये वाढ होणार आहे. कारण, भाजपने आरपीआयला कोणतीही मदत केली नाही. आता आरपीआय सर्वच गट भाजपला व महायुती, महाविकास आघाडीला कोणतीही मदत करणार नाही. हे सुद्धा स्पष्ट झालेले आहे.

या मेळाव्याला आरपीआयच्या विविध गट व दलित संघटना, अल्पसंख्याक समाज व इतर वंचित घटकांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपला स्वाभिमानी बाणा दाखवला. युती- आघाडी म्हणजे अपमान करण्याचे एक मोठे साधन झालेले आहे.

कार्यकर्त्यांना विचारात न घेता फक्त नेत्याचे फोटो लावले म्हणजे त्या समाजाला आपण विचारले. असे एक अंधश्रद्धा होती. ही अंधश्रद्धा दूर करण्याचे काम आरपीआय गवई गटाचे सर्वच कार्यकर्ते करणार आहेत. किमान आम्हाला विजय गाठण्यासाठी काही बेरजेचे राजकारण करावे लागणार आहे. ते आम्ही करत आहोत. कारण ,आघाडी व महायुतीमध्ये मोठी धुसफूस आहे. याचा फायदा आरपीआय उमेदवार श्री संजय गाडे यांना मिळेल. कारण प्रत्येक वेळेला प्रस्थापित व घराणेशाहीला बळकटी देण्याचेच काम होत आहे. यावेळी श्री संजय गाडे यांच्या उमेदवारीमुळे सामान्य माणसाला प्रसिद्ध मिळत आहे. त्यामुळे मतभेद विसरून सर्व पुरोगामी व विचारवंतांनी आरपीआय उमेदवार संजय गाडे यांना एकमुखी पाठिंबा दिलेला आहे त्याचे आम्ही स्वागत करतो असे स्पष्ट केले .या मेळाव्याला सिद्धार्थ गायकवाड, अरुण बगाडे, प्रदीप कांबळे, विजय यादव, सिकंदर शेख, अभिजीत पाटील, विजय कांबळे, अनिकेत धडचिरे, विजय जाधव, राजेंद्र कांबळे, शशिकांत पवार, अभिजीत कांबळे, बापू गाडे, रेखा सकटे भानुदास साठे, प्रकाश खुडे, सौ संगीता कांबळे, सौ प्रज्ञा गायकवाड, विशाखा राऊत, स्वाती गायकवाड, आधी उपस्थित होते.